सन २०१७-१८ करीता आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम अंतर्गत मंजूर Creation of baseline for the PVTG groups या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः आदिम-२०१७/प्र.क्र.७२/का-१९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २२/०९/२०१७

वाचा-

१. **जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०५/२०१७-TSP, दि.३०/०५/२०१७**

प्रस्तावना -

आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम या योजनेअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता केंद्र शासनाने रु. १६३५.०० लक्ष निधीच्या एकुण १८ प्रस्तावांना वाचा क्र. १ वरील पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे. या योजनेअंर्तगत केंद्र शासनाने Creation of baseline for the PVTG groups या योजनेच्या एकुण रु. २५.०० लक्ष किंमतीच्या प्रस्तावास मंजूरी प्रदान केली आहे. आदिवासी विकास विभाग व मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्था ह्याच्या मध्ये महाराष्ट्र राज्यातील आदिवासी विकास संबंधीत विविध बाबींवर संशोधन आणि धोरण आखणी बाबत सामंजस्य करार झाला आहे. केंद्र सरकारने सर्व १८ राज्य सरकारांनी आपापल्या राज्यांतील प्रत्येक आदिम जमातीच्या विशिष्ट गरजा समजून घेण्यासाठी पायाभूत पाहणी (बेस लाईन सर्वे) करण्याचे निर्देश दिले आहेत. महाराष्ट्रात कातकरी, कोलम आणि माडिया गोंड या तील आदिम जमाती आढळून येतात. सबब, या तीन जमातींचा बेस लाईन सर्वे करण्यासाठी आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर निधीतून करण्यात येणार आहे. सदर निधीतून Creation of baseline for the PVTG groups योजनेच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय-

या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक १ नुसार Creation of baseline for the PVTG groups योजनेच्या एकुण रु. २५.०० लक्ष किंमतीच्या अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

सदर मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२२१५४०२१७७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ajitsingh R Rajput

Digitally signed by Ajitsingh R Rajput
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=TDD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a614ce75be611413980d3efebe7cde81ad571ab119e8360b7b526b5159edd099, serialNumber=32168d31c7d800af039db3657f6a01d233033f3f7c16b7ca135b2c868025eb3e, cn=Ajitsingh R Rajput
Date: 2017.09.22 15:29:55 +05'30'

(अ.रा.राजपूत)
कक्ष अधिकारी

प्रत,

१. मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई

२. मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. स्वीय सहायक,मा. सचिव,आदिवासी विकास,मंत्रालय,मुंबई
४. आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक.
५. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
६. सहसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
७. उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड.
९. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा.
१०. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर.
११. प्रा. नीरज हातेकर, संचालक , मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्था, मुंबई.
१२. प्रा. अभय मोरेश्वर पेठे, प्राध्यापक, मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्था, मुंबई.
१३. प्रा विनायक देशपांडे, प्राध्यापक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
१४. डॉ. मनीषा करणे, मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्था, मुंबई.
१५. संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१६. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.

आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम -सन २०१७-१८
परिशिष्ट क्र.१

<table>
<tr><td>१</td><td>योजनेचे नांव -</td><td>Creation of baseline for the Particularly Vulnerable Tribal Groups (PVTG) in Maharashtra</td></tr>
<tr><td>२</td><td>लाभार्थी/ युनिट संख्या.</td><td>१०,००० कोलाम, माडिया गोंड आणि कातकरी कुटुंबे</td></tr>
<tr><td>३</td><td>योजनेचे प्रस्तावित लाभ क्षेत्र</td><td>जिल्हावार यादी परिशिष्ट १ मध्ये जोडली आहे</td></tr>
<tr><td>४</td><td>वित्तीय तरतूद</td><td>सन २०१७-१८ करीता आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर रु.२५.०० लक्ष</td></tr>
<tr><td>५</td><td>योजनेसाठी येणा-या खर्चाचे सविस्तर अंदाजपत्रक</td><td>
<table>
<tr><td>बाब</td><td>दर (रु)</td><td>एकूण खर्च (रु)</td></tr>
<tr><td>प्रश्नावली छपाई</td><td>१५</td><td>१,५०,०००</td></tr>
<tr><td>अन्वेषकांचा मोबदला</td><td>प्रती प्रश्नावलीस रु १५०</td><td>१५,०००००</td></tr>
<tr><td>प्रवास खर्च</td><td></td><td>२,५०,०००</td></tr>
<tr><td>निवास खर्च</td><td></td><td>१,००,०००</td></tr>
<tr><td>भोजन खर्च</td><td></td><td>५०,०००</td></tr>
<tr><td>मानववंशशास्त्र तज्ञ सल्लागार मानधन</td><td></td><td>५०,०००</td></tr>
<tr><td>संगणकीय प्रक्रिया</td><td>प्रती प्रश्नावलीस रु. १५</td><td>१,५०,०००</td></tr>
<tr><td>आकस्मिक खर्च</td><td></td><td>२,५०,०००</td></tr>
<tr><td>एकूण खर्च</td><td></td><td>२५,००,०००</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>६</td><td>योजना राबविणारी यंत्रणा</td><td>आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे व मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था, मुंबई विद्यापिठ</td></tr>
<tr><td>७</td><td>अंमलबजावणी अधिकारी</td><td>आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे</td></tr>
<tr><td>८</td><td>नियंत्रक अधिकारी</td><td>सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.</td></tr>
<tr><td>९</td><td>योजनेचा उद्देश</td><td>१.जन जातीय कार्य मंत्रालय , भारत सरकार द्वारा अति मागास आदिवासी समुदायांच्या विकासासाठी १.०४.२०१५ पासून योजना कार्यान्वयित करण्यात आली आहे (आदिवासी विकास विभाग, भारत सरकार, F.No. २२०४०/३७/२०१२-NGO). आदिम जमातींचा सर्वंकष आणि दृश्य सामाजिक आणि आर्थिक विकास घडून आणणे हे ह्या योजनेचे उदिष्ट आहे. ह्या योजनेंतर्गत सर्व १८ राज्य सरकारांनी आपापल्या राज्यांतील प्रत्येक आदिम जमातीच्या विशिष्ट गरजां समजून घेण्यासाठी पायाभूत पाहणी (बेस लाईन सर्वे) करून घ्यावयाचे आहे.
२. महाराष्ट्रामध्ये कातकरी, कोलम आणि माडिया गोंड या तीन आदिम जमाती आढळून येतात. वरील योजना राबविण्यासाठी ह्या तीन आदिम जमातींची पायाभूत पाहणी करावयाची आहे.</td></tr>
</table>

१०	योजना अंमलबजावणीची कार्यपद्धती	१. आदिवासी विकास विभाग व मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्था ह्याच्या मध्ये महाराष्ट्र राज्यातील आदिवासी विकास संबंधीत विविध बाबींवर संशोधन आणि धोरण आखणी बाबत सामंजस्य करार झाला आहे. २. सदर कराराच्या अधीन राहून या तीन आदिम जमातींचा base line सर्व्हे करण्यात येईल.
११	निधी वितरणाचे टप्पे	१. अंमलबजावणी संस्थेस म्हणजेच मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था, मुंबई विद्यापिठ यांना योजना अंमलबजावणीच्या सुरवातीस रु. १५ लक्ष निधी वर्ग करावा. २. सर्व्हेचे काम पुर्ण झाल्या नंतर सर्व्हेचा अहवाल मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था, मुंबई विद्यापिठ यांनी सुकाणू समितीसमोर सादर केल्यानंतर उर्वरीत रु. १० लक्ष इतका निधी वर्ग करावा.
१२	योजनेच्या अटी व शर्ती	१. सर्वेक्षण करताना नमुना संख्या १०,००० कुटुंबे ह्या पेक्षा कमी नसावी. २. सदर सर्व्हेचे काम मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था, मुंबई विद्यापिठ यांचे मार्फत विहीत कालावधीमध्ये पुर्ण करून घेण्याची जबाबदारी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांची राहील. ३. सदर योजनेच्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहीत नमुन्यात मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्था यांनी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना सादर करावे. ४. सदर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल योजना पुर्ण झाल्यानंतर छायाचित्रण, चलचित्रफीत यासह सादर करावा. ५. योजनेच्या अंमलबजावणीमध्ये क्षेत्रीय कार्यालयास काही अडचण निर्माण झाल्यास योजना अंमलबजावणीच्या कार्यपध्दतीत बदल करण्याचा अधिकार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना राहील.
१३	योजनेचा कालावधी	निधी प्राप्त झाल्यापासून ६० दिवस
१४	योजनचे संनियंत्रण व मुल्यमापन पर्यवेक्षण	➢ सदर योजनेचे मुल्यामापन व सनियंत्रण करण्यासाठी पुढीलप्रमाणे सुकाणू समिती गठित करण्यात येत आहे. १ सचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई - अध्यक्ष २ आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे -सदस्य सचिव ३ प्रा. नीरज हातेकर, संचालक , मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्था -सदस्य ४ प्रा. अभय मोरेश्वर पेठे, प्राध्यापक, मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्था -सदस्य ५ प्रा विनायक देशपांडे, प्राध्यापक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ -सदस्य ६ डॉ. मनीषा करणे, मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्था -सदस्य

		७ संबधित उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. -सदस्य ८ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड -सदस्य ९ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा -सदस्य १० प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर -सदस्य ➢ उपरोक्त समितीद्वारे मुंबई अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण संस्थेमार्फत सर्व्हेचे काम पुर्ण झाल्यानंतर त्या अहवालाचे सविस्तर मुल्यामापन करून सविस्तर अहवाल शासनास पुढील १५ दिवसांमध्ये सादर करेल. ➢ उपरोक्त समिती मुल्यामापन व सनियंत्रणाशिवाय सदर सर्व्हे करताना अंमलबजवणी यंत्रणेस काही अडचणी आल्यास त्याबाबत आवश्यक मार्गदर्शन करून सर्व्हेचे काम पुर्ण करून घेईल.

परिशिष्ट १

PVTG	जिल्हा व तालुका		नमुना संख्या
Katkari	**जिल्हा**	रायगड	
	तहसील	सुधागड	५२०
	तहसील	खालापूर	१०७८
	तहसील	रोहा	७७९
	जिल्हा	पालघर	
	तहसील	वाडा	६२६
	तहसील	जव्हार	३७९
	तहसील	मोखाडा	४५६
Madia	**जिल्हा**	गडचिरोली	
	तहसील	मुलचेरा	४१९
	तहसील	एटापल्ली	४९२
	तहसील	भामरागड	२५२
Kolam	**जिल्हा**	यवतमाळ	
	तहसील	कळंब	११८२
	तहसील	केळापूर	१३९४
	तहसील	मारेगाव	९०२
	तहसील	झारी-झमणी	७३०
	जिल्हा	चंद्रपूर	
	तहसील	जिवती	५२४
	जिल्हा	नांदेड	
	तहसील	माहूर	२६७
एकुण			१०,०००